ePaper
॥ वर्ष - 7 । अंक - 356 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 27 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## विधान परिषदेसाठी 71.87 टक्के मतदान; भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादीची कसोटी



### आतील पानांत


- अफगाणिस्तान इतिहास घडवणार?
- सूर्यने गमावलं अव्वल स्थान
- विरोधी पक्षनेता हे फक्त पद नाही!
- मला बदामाची गरज नाही!


### महापालिका आरोग्य विभागाची सतर्कता

# डेंगीचा उच्छाद वाढला!

## शहरात 1 हजार 450 घरांवर कारवाई : डासांची पैदास नष्ट करण्याची मोहीम

। पिंपरी । महाईन्यूज

**घर व परिसरामध्ये साफसफाई न ठेवल्याने परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर डासांची पैदास होते. पिंपरी चिंचवड शहरातील अशा घरांची तपासणी करण्यात येत आहे. आतापर्यंत २२ दिवसांत १ हजार ४५० घरांमध्ये डेंगीच्या आढळून आल्या आहेत. त्या घरमालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एकूण ७२ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. घरांसोबत शहरातील पंक्चर व भंगाराची दुकाने, बांधकामे व इतर ठिकाणाची तपासणी आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.**



पावसाळा सुरू झाल्याने डेंग्यू, मलेरिया यासह साथीच्या आजारांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी आरोग्य विभागाकडून पाहणी करण्यात येत आहे. शहरात डेंगी डासांची पैदास होणारी ठिकाणी नष्ट करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामध्ये शहरातील घरे, जुनी व नवीन बांधकामे तसेच, पंक्चर व टायर आणि इतर आस्थापनांची तपासणी केली जात आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाच्या वतीने गेल्या २२ दिवसांमध्ये १ लाख १ हजार १९५ घरांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १ हजार ४५० घरांमध्ये ेंगीच्या आळ्या आढळल्या. तर २८२ टायर व पंक्चर आणि भंगारच्या दुकानाची तपासणी करण्यात आली. शहरात अनेक ठिकाणी बांधकामे सुरू आहेत. याठिकाणी पाणी साचत असल्याने त्यामध्ये डेंगीच्या अळ्यांची पैदास होते. पथकाच्या वतीने अशा २८० बांधकामांचीही तपासणी करण्यात आली. डेंगीच्या अळ्या आढळलेल्या ठिकाणच्या मालकांवर कारवाई करण्यात आली आहे. अशा मालकांची संख्या १४ असून, त्यांच्याकडून ७२ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. तर ज्या नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता ठेवलेली नाही, अशा ५८५ मालकांना नोटीस बजावण्यात आली आहे.

### परिसरात पाणी साचू देऊ नका...

शहरामध्ये आरोग्य विभागाच्या पथकाकडून सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यामध्ये डास आणि डेंगीच्या अळ्या सापडलेल्या घरमालकांना नोटीस बजावण्यात आली असून, काही जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. नागरिकांनी आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावे. कुंड्या, फ्रीजच्या खाली, आदी ठिकाणी पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. परिसरात पाणी साचू देऊ नये. त्यामुळे डासांची पैदास होणार नाही. पंक्चर व भंगार दुकाने व बांधकाम ठिकाणाचीही तपासणी केली जाणार आहे, असे आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

### संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज संभाजी महाराज देहूकर यांचे निधन

## कीर्तन, प्रवचन, चरित्र कथन या माध्यमांतून तुकोबारायांच्या जीवनकार्याचा केला प्रचार-प्रसार

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील थोर कीर्तनकार, संत साहित्याचे अभ्यासक, संत तुकाराम महाराज संस्थानचे माजी विश्वस्त, तुकोबारायांचे दहावे वंशज ह.भ.प. संभाजमहाराज मोरे देहूकर यांचे आज देहावसान झाले. हभप संभाजी महाराज हे पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील देहूगाव येथील रहिवासी आहेत. संभाजी महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवन चरित्राचा सांगोपांग अभ्यास करून कीर्तन, प्रवचन आणि चरित्र कथन या माध्यमांतून तुकोबारायांच्या आध्यात्मिक जीवनकार्याचा प्रचार-प्रसार केला आहे.**




आषाढी कार्तिकीच्या निमित्ताने त्यांनी महाराष्ट्रभर कीर्तन प्रवचने केली आहेत. त्यांच्या पार्थिवावर इंद्रायणी काठी, श्री क्षेत्र देहू याठिकाणी दुपारी एकला अंत्यसंस्कार होणार आहेत. संभाजी महाराज यांच्या कीर्तनाची परंपरा त्यांचे चिरंजीव प्रशांत महाराज देहूकर ही पुढे नेत आहेत.

२००९ मध्ये महाबळेश्वर येथील ८२व्या अखील भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव यांनी लिहीलेल्या 'संतसूर्य तुकाराम' या विकृत कादंबरीतून तुकाराम महाराजांचे चारित्र्य हनन केले. म्हणून त्यांच्याविरूद्ध जाहीर निषेध करून साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मागितला, तसेच ही कादांबरी मागे घेण्यासाठी पाठपुरावाही केला आणि त्यामुळे ही कादंबरी लेखकाला आणि प्रकाशकाला मागे घ्यावी लागली. समस्त वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या म्हणून त्यांना साहित्य संमेलनाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि अध्यक्षांशिवाय महाबळेश्वर येथील २००९ चे साहित्य संमेलन घ्यावे लागले. यादव आणि प्रकाशक मेहता पब्लिकेशन कं. यांच्या विरूद्ध पुणे येथे मानहानीचा खटला दाखल केला.

### देहूकर महाराज यांची ओळख...

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे विद्यमान १० वे वंशज आहेत.
जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांवरील जीवनचरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे.
'संत तुकाराम महाराज देवस्थान संस्थान' चे माजी विश्वस्त आणि आषाढी वारी पालखी सोहळा प्रमुख.

# गणेशोत्सवात मेट्रोची स्वारगेटपर्यंत धाव

## 95 टक्के पूर्ण झाले असून, जुलैअखेरीस ते पूर्ण होणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोची स्वारगेटपर्यंत सेवा गणेशोत्सवाच्या आधी सुरू होण्याची शक्यता आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून, जुलैअखेरीस ते पूर्ण होणार आहे. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आधी या मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्याचे महामेट्रोने नियोजन केले आहे.**



जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी तीन स्थानके असून, हा मार्ग ३.६४ किलोमीटरचा आहे. या भुयारी मार्गावर मेट्रोची चाचणी फेब्रुवारीमध्ये घेण्यात आली. यातील जिल्हा न्यायालय स्थानक ते बुधवार पेठ स्थानक मार्ग मुठा नदीपात्राच्या खालून जातो. त्यामुळे शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारे नदीपात्राखालून मेट्रो धावणार आहे. या मार्गाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मार्गाचे काम जुलैअखेरीस पूर्ण करण्याचे महामेट्रोचे नियोजन आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. मेट्रो मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना तपासणीसाठी बोलाविण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त या मार्गाची तपासणी करून त्याला अंतिम मंजुरी देतील. ही मंजुरी मिळाल्यानंतर मेट्रोकडून राज्य सरकारकडे या मार्गावर सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविला जाणार आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात या मार्गावर सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. कारण सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. आचारसंहिता लागू झाल्यास ही सेवा सुरू होणे लांबणीवर पडू शकते, असे सूत्रांनी सांगितले.शहरातील मध्यवर्ती पेठांच्या भागात मानाचे गणपती आहेत. या गणपतींच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाल्यास भाविकांची मोठी सोय होणार आहे. मध्यवर्ती भागात गर्दीमुळे भाविकांना वाहनाने जाणे शक्य होत नाही. अशा ठिकाणी भाविक मेट्रोच्या सहाय्याने जाऊ शकणार आहेत. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. हे काम जुलैच्या अखेरपर्यंत पूर्ण होईल. या मार्गावरील सेवा गणेशोत्सवाच्या आधी सुरू करण्याचे आमचे प्रयत्न आहेत.जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी तीन स्थानके असून, हा मार्ग ३.६४ किलोमीटरचा आहे. या भुयारी मार्गावर मेट्रोची चाचणी फेब्रुवारीमध्ये घेण्यात आली. यातील जिल्हा न्यायालय स्थानक ते बुधवार पेठ स्थानक मार्ग मुठा नदीपात्राच्या खालून जातो. त्यामुळे शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारे नदीपात्राखालून मेट्रो धावणार आहे. या मार्गाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मार्गाचे काम जुलैअखेरीस पूर्ण करण्याचे

### मेट्रो मार्गाचे काम 95 टक्के पूर्ण

आचारसंहिता लागू झाल्यास ही सेवा सुरू होणे लांबणीवर पडू शकते, असे सूत्रांनी सांगितले.शहरातील मध्यवर्ती पेठांच्या भागात मानाचे गणपती आहेत. या गणपतींच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाल्यास भाविकांची मोठी सोय होणार आहे. मध्यवर्ती भागात गर्दीमुळे भाविकांना वाहनाने जाणे शक्य होत नाही. अशा ठिकाणी भाविक मेट्रोच्या सहाय्याने जाऊ शकणार आहेत. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे.

# सावधान! पुण्यात झिकाचा धोका आणखी वाढला

## मुंढव्यातील कोंद्रेवस्ती परिसरात झिकाचा आणखी एक रुग्ण

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंढव्यातील कोंद्रेवस्ती परिसरात झिकाचा आणखी एक रुग्ण आढळला आहे. या रुग्णाचा खासगी प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल झिका पॉझिटिव्ह आला असून, त्याचा राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेचा तपासणी अहवाल अद्याप आरोग्य विभागाला मिळालेला नाही. पुण्यातील झिकाची रुग्णसंख्या आता तीनवर पोहोचली आहे.**

एरंडवणा भागात डॉक्टर आणि त्याच्या मुलीला झिकाचा संसर्ग झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता मुंढव्यातील कोंद्रे वस्तीत ४७ वर्षीय महिलेला झिकाचा संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले. या महिलेला वारंवार ताप येऊ लागल्याने ती हडपसरमधील खासगी रुग्णालयात दाखल होती. तिच्या तापाचे नेमके निदान होत नसल्याने डॉक्टरांनी तिची झिकासाठी चाचणी केली. या महिलेचा खासगी प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. तिचा रक्त नमुना तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत पाठविण्यात आला असून, त्याचा तपासणी अहवाल अद्याप आरोग्य विभागाला मिळालेला नाही.या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचे



सहाय्यक संचालक डॉ.प्रतापसिंह सारणीकर यांनी महापालिकेच्या आरोग्य प्रमुखांना पत्र पाठविले आहे. या पत्रात म्हटले आहे की, महापालिकेच्या हद्दीत झिकाचे तीन रुग्ण आढळून आले आहेत. त्याठिकाणी आरोग्य विभागाच्या कीटकशास्त्रीय पथकाने तपासणी केली आहे. रुग्ण आढळलेल्या परिसरात महापालिकेने ताप रुग्णांचे सर्वेक्षण सुरू करावे. याचबरोबर त्या परिसरात सकाळी ८ ते १० आणि संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करावी. झिका रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील ताप रुग्णांचे रक्त नमुने घेऊन तपासणीसाठी पाठविण्यास महापालिकेला सांगण्यात आले आहे. याचबरोबर त्या परिसरातील गर्भवतींची नोंद करून त्यांची ३ महिन्यांतून एकदा सोनोग्राफी करण्याच्याही सूचना केल्या आहेत.एरंडवणा भागात डॉक्टर आणि त्याच्या मुलीला झिकाचा संसर्ग झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता मुंढव्यातील कोंद्रे वस्तीत ४७ वर्षीय महिलेला झिकाचा संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले. या महिलेला वारंवार ताप येऊ लागल्याने ती हडपसरमधील खासगी रुग्णालयात दाखल होती. तिच्या तापाचे नेमके निदान होत नसल्याने डॉक्टरांनी तिची झिकासाठी चाचणी केली. या महिलेचा खासगी प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे.

### झिकाचे तीन रुग्ण आढळून आले

मुंढव्यातील कोंद्रेवस्ती परिसरात झिकाचा आणखी एक रुग्ण आढळला आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी महापालिकेच्या आरोग्य प्रमुखांना पत्र पाठविले आहे. या पत्रात म्हटले आहे की, महापालिकेच्या हद्दीत झिकाचे तीन रुग्ण आढळून आले आहेत. त्याठिकाणी आरोग्य विभागाच्या कीटकशास्त्रीय पथकाने तपासणी केली आहे. रुग्ण आढळलेल्या परिसरात महापालिकेने ताप रुग्णांचे सर्वेक्षण सुरू करावे. याचबरोबर त्या परिसरातील गर्भवतींची नोंद करून त्यांची ३ महिन्यांतून एकदा सोनोग्राफी करण्याच्याही सूचना केल्या आहेत.

# सद्गुरूनगर येथील सेवा रस्त्याच्या कामाला

# अखेर ‘ग्रीन सिग्नल’!

## परिसरातील 10 हजार रहिवाशांसह वाहनचालकांना दिलासा

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारे प्रश्न सुटला

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाशिक महामार्गावरील भोसरी-सदगुरूनगर येथे मुख्य रस्त्याला सेवा रस्ता नव्हता. धोकादायक रस्ता दुभाजकामुळे १०० मीटर पेक्षा जास्त अंतराच्या पट्टयात वाहतूक समस्या, अपघाताच्या घटना नित्याच्या झाल्या होत्या. या प्रश्नाकडे वाहतूक पोलीस प्रशासन व महापालिका प्रशासनाचेही दुर्लक्ष झाले होते. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, आवश्यक असलेल्या सेवा रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**





भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने भोसरी विधानसभा मतदार संघात “वाहतूक कोंडीमुक्त भोसरी मतदार संघ” ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. वाहतूक पोलीस, महापालिका, एमआयडीसी, आरटीओ आणि पोलीस प्रशासनाच्या समन्वयातून वाहतूक संबंधित समस्या मार्गी लावण्यात येत आहेत. तसेच, मतदार संघातील वाहतूक कोंडी आणि अपघातप्रवण ‘रेड स्पॉट’ निश्चित केले असून, त्यावर कालबद्ध उपाययोजना केल्या जात आहेत. दरम्यान, सदगुरूनगर- भोसरी येथील पुणे-नाशिक महामार्गावरील अत्यंत वर्दळीच्या रस्त्याला पर्यायी रस्ता उपलब्ध नव्हता. अवघ्या १०० मीटर पेक्षा जास्त अंतराच्या या पट्टयामध्ये वाहतूक विस्कळीत होत असे आणि रोजच्या अपघाताच्या घटनाही वाढल्या होत्या. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमधून सदर सेवा रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.

यावर तात्काळ कार्यवाही करीत आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने सेवा रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक राजेंद्र लांडगे, माजी नगरसेविका सारिका लांडगे, माजी नगरसेवक सागर गवळी, योगेश लांडगे, संतोष लांडगे, नवनाथ लांडगे, सतीश लांडगे, अनिल लांडगे, धनाजी लांडगे, बाळासाहेब रेटवडे, खंडू मांदळे, रामदास चव्हाण, सोपान शिंदे, सचिन चव्हाण, पुंडलिक मोकाशी, अजिंक्य नेहेरे, मयूर नेहरे, पोपट लिंबोरे, अनिकेत भोंगळे, सुरेश थोरात, सोमनाथ मोहिते यांच्यासह स्थानिक नागरिक व रहिवाशी उपस्थित होते. या कामामुळे परिसरातील सुमारे १० हजाराहून अधिक स्थानिक नागरिक, वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

> “पुणे-नाशिक महामार्गावर वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात आहे. सदगुरूनगर येथील भागात सेवा रस्ता उपलब्ध नसल्यामुळे आणि धोकादायक रस्ता दुभाजकामुळे रहिवाशी भागातून मुख्य रस्त्यावर येणारी वाहने आणि मुख्य रस्त्यावरुन सदरगुरूनगरकडे वळणारी वाहने याचा अंदाज न आल्यामुळे अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. याबाबत स्थानिक नागरिकांनी सदर सेवा रस्त्याचे काम मार्गी लावण्याबाबत सूचवले होते. त्याची तात्काळ कार्यवाही सुरू झाली असून, लवकरच हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल.
>
> **– महेश लांडगे,** आमदार,

---

# हिंजवडीतील ‘कोंडी’ सोडविण्यासाठी शंकर जगताप सरसावले!

## पीएमपीच्या एसी व आरामदायी बसेस सुरू करा : डॉ. संजय कोलते यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील आयटी पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यांवर दररोज होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जुनी सांगवी ते पिंपळेसौदागर रहाटणीमार्गे हिंजवडी, चिंचवडगाव ते वाल्हेकरवाडी, रावेतमार्गे हिंजवडी आणि चिंचवडगाव ते काळेवाडी, थेरगावमार्गे हिंजवडी या तीन मार्गावर वातानुकूलित (एसी) आणि आरामदायी इलेक्ट्रिकल विशेष बसेस सुरू करावेत, अशी मागणी भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पीएमपीएमएलकडे केली आहे. तसेच सर्व मेट्रो स्थानकांकडे जाणाऱ्या सर्व फीडर रुटवर दर १५ मिनिटांनी एक बस धावेल याचे नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.**



यासंदर्भात भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे, “पिंपरी-चिंचवड हे वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहराच्या सर्वच भागात गेल्या पाच वर्षात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढलेली आहे. शहराला लागूनच आंतरराष्ट्रीय दर्जाचे हिंजवडी आयटी उभे आहे. या आयटी पार्कमधील आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणारे अभियंते, कर्मचारी पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या भागात मोठ्या संख्येने वास्तव्य करीत आहेत. या कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी वाकड, हिंजवडी या भागात दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. हिंजवडीकडे जाणाऱ्या मार्गावर पीएमपीएमएलमार्फत वातानुकूलित आणि आरामदायी बसेस मोठ्या संख्येने उपलब्ध करून दिल्यास वाहतूक कोंडी सोडविणे शक्य होईल. त्यानुसार जुनी सांगवी ते नवी सांगवी, वसंतदादा पुतळा, सुदर्शन नगर, पिंपळे सौदागर, रहाटणी, कस्पटेवस्तीमार्गे हिंजवडी, चिंचवडगाव येथून वाल्हेकरवाडी, रावेत, मुकाई चौक मार्गे हिंजवडी आणि चिंचवडगाव ते काळेवाडी, थेरगाव वाकडमार्गे हिंजवडी या तीन मार्गावर वातानुकूलित आणि आरामदायी इलेक्ट्रिक बस तातडीने सुरू करण्यात यावी. तशी या भागातील प्रवाशांची आणि नागरिकांचीही मागणी आहे.

### 15 मिनिटांनी एक बससेवा सुरु करावी

पिंपरी येथील मेट्रो स्थानकासाठी चिंचवडगाव, आकुर्डी, काळेवाडी, केएसबी चौक, रावेत, बिजलीनगर, संभाजीनगर, शाहूनगर, अजंठानगर आदी भागातून तसचे संत तुकारामनगर मेट्रो स्थानकासाठी पिंपरीगाव, नेहरूनगर, स्पाईनरोड, सेक्टर क्रमांक ११, १३, १६, चिखली, कुदळवाडी, मोशी-बोऱ्हाडेवाडी आदी परिसरातून, कासारवाडी-भोसरी मेट्रो स्थानकासाठी पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, वाकड, कोकणे चौक, भोसरी, इंद्रायणीनगर, संतनगर, मोशी, दिघी या परिसरातून, फुगेवाडी मेट्रो स्थानकासाठी पिंपळे गुरव, नवी सांगवी या परिसरातून, दापोडी मेट्रो स्थानकासाठी जुनी सांगवी, पिंपळे निलख या परिसरातून प्रत्येक १५ मिनिटांनी एक याप्रमाणे बससेवा सुरु करावी.

# शाळेचे 'सजग' भान गरजेचे



## भूमिका

**शिक्षणाच्या क्षेत्रात सर्वात चर्चेचा विषय म्हणजे शाळेची वेळ. राज्यपालांच्या सूचनेनुसार शालेय शिक्षण विभागाने चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी नऊनंतर भरवण्याचे आदेश दिले आहेत.परवानगीविना सकाळी नऊपूर्वी शाळा भरवल्यास कारवाईचे संकेत शिक्षण विभागाने दिले आहेत. शारीरिक, मानसिकदृष्ट्या मुलांसाठी आणि नियोजनाच्या दृष्टीने पालकांसाठी योग्य वेळ काय, याच मुद्द्याकडे शाळा, पालकांचे दुर्लक्ष होत आहे.**



पूर्वी बहुतांश शाळा शनिवार वगळता सकाळी उशिराच असायच्या. दोन सत्रांत भरणाऱ्या शाळांमध्ये काही वर्ग सकाळी लवकर असायचे. मात्र गेल्या काही वर्षांत एकच सत्र असूनही शाळा लवकर भरण्याची पद्धत रुजली आहे. मुलांनी लवकर उठले पाहिजे, या भूमिकेतून पालकांनीही ती वेळ स्वीकारली आहे, तर काही पालकांना ती वेळ मान्य नसूनही नाइलाजास्तव स्वीकारावी लागली आहे. सकाळी सात वाजल्यापासून शाळा असल्यास मुलांना, पालकांना लवकर उठून आवरावे लागते. सध्याच्या कामाच्या संस्कृतीनुसार बरेच पालक रात्री उशिरापर्यंत काम करत असतात. पालक रात्री उशिरापर्यंत जागे असल्याने अनेकदा मुलेही उशिराच झोपतात. परिणामी, सकाळच्या शाळेत मुले झोपाळलेली असतात. त्यांचे वर्गात लक्ष लागत नाही. दुपारी शाळा संपवून घरी आल्यावर अर्धवट राहिलेली झोप पूर्ण करणे किंवा टीव्ही-मोबाइल पाहण्यात त्यांचा वेळ जातो किंवा खासगी शिकवणी वर्ग, पाळणाघरात जावे लागते. यात मुलांच्या शारीरिक, भावनिक विकासाचा प्रश्न निर्माण होतो. महत्त्वाचे म्हणजे, मुले घरी येतात तेव्हा पालक घरी नसतात. त्यामुळे पालक-मुलांचा संवाद होत नाही. शाळा सकाळी लवकर असल्यास मुलांना, पालकांना, शिक्षकांनाही त्रास सहन करावा लागतो, असे ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ डॉ. सुनील गोडबोले सांगतात. 'शाळेची वेळ सकाळी सात, आठ वाजता शाळा असू नये. लवकरच्या शाळेमुळे मुलांची झोप पूर्ण होत नाही. त्याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे, लवकरच्या शाळेमुळे मुले प्रातर्विधी, व्यवस्थित न्याहारी न करताच शाळेत जातात. त्यामुळे दिवसच चुकीच्या पद्धतीने सुरू होतो. परिणामी, मुलांना बद्धकोष्ठता, ॲसिडिटी असे त्रास सुरू होतात. शरीरातील डोपामिनसारखे हार्मोन्सची तीव्रता सकाळी अधिक असते आणि सायंकाळी कमी होत जाते. मात्र, सकाळी लवकरच्या शाळेमुळे मुलांचा उत्साह, शारीरिक, मानसिक क्षमतेवर परिणाम होतो. सकाळच्या शाळेसाठीच्या धावपळीत मुलांची तयारी, त्यांचे आवरणे पालकांना करावे लागते. त्यामुळे मुलांना स्वतः आवरण्याची शिस्त लागत नाही. विद्यार्थी, पालकांप्रमाणे सकाळची शाळा शिक्षकांसाठीही त्रासदायक आहे. कारण, शिक्षक हे पालकही असतात. त्यांना त्यांच्या मुलांनाही वेळ द्यायचा असतो. मात्र, त्यांचीच शाळा सकाळची असल्याने मुलांना वेळ देता येत नाही,' असे गोडबोले सांगतात. डॉ. गोडबोले यांनी सकाळी नऊनंतर शाळा ठेवण्याबाबत सकारात्मकता दर्शवतानाच जोडून आणखीही काही मुद्दे मांडले, तेही महत्त्वाचे आहेत. ते सांगतात, 'सकाळी उशिरा शाळा असली, तरी मुलांनी सकाळी लवकर उठून प्रातर्विधी करणे, न्याहारी, स्वयंअध्ययन, व्यायाम, पालकांशी संवाद अशा पद्धतीने सकाळचा वेळ वापरला जाणे महत्त्वाचे आहे. शाळा सकाळी उशिरा असली, तरी सगळ्याच गोष्टी उशिराने करणे योग्य नाही. मुलांनी रात्री लवकर झोपणे गरजेचे आहे. पालकांची कामे, स्क्रीन टाइम यामुळे मुलांच्या झोपेची वेळ पुढे ढकलली जाऊ नये.' अजूनही काही शाळा दोन सत्रांत भरत असल्यास त्यांच्या तांत्रिक अडचणी समजून घेता येऊ शकतात. त्याबाबत शिक्षण विभागाशी चर्चा करून मार्ग काढणे शक्य आहे. मात्र, शाळा एकाच सत्रात असूनही सकाळी लवकर शाळा भरवण्याची आग्रही भूमिका मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिकदृष्ट्या हितावह नाही. म्हणूनच सकाळी लवकरची शाळा म्हणजे झोपलेले शिक्षण अशी अवस्था आहे. या सगळ्याचा विचार करता पालक, शिक्षक, संस्थाचालक या सर्वच घटकांनी आपापली मत-मतांतरे बाजूला ठेवून केवळ विद्यार्थिकेंद्रित विचार करण्याची गरज आहे. पूर्वी बहुतांश शाळा शनिवार वगळता सकाळी उशिराच असायच्या. दोन सत्रांत भरणाऱ्या शाळांमध्ये काही वर्ग सकाळी लवकर असायचे. मात्र गेल्या काही वर्षांत एकच सत्र असूनही शाळा लवकर भरण्याची पद्धत रुजली आहे. मुलांनी लवकर उठले पाहिजे.

## प्रासंगिक »

### अपंगत्वी आनंद!

***पेट्रोल-डिझेल हे घटक वस्तू-सेवा कराच्या बाहेर ठेवण्यात तर खुद्द केंद्राचेही हितसंबंध आहेत; मग 'राज्यांनी ठरवावे' हा बहाणा कशाला?***

१ जुलैस, वस्तू आणि सेवा कर अमलात आला त्यास सात वर्षे होतील. या सात वर्षांत या कराचे नियमन करणाऱ्या समितीच्या तब्बल ५२ बैठका झाल्या आणि विद्यमान 'रालोआ' आघाडी सत्तेवर आल्यानंतर नव्या सरकारची या करासाठीचीच पहिली बैठक गेल्या आठवड्याच्या अखेरीस पार पडली. ती ५३ वी. कोणतीही नवी करप्रणाली पहिल्या दिवसापासून अचूक असणे अपेक्षित नाही हे सत्य मान्य केले तरी सात वर्षे आणि ५२ बैठकांनंतरही वस्तू-सेवा करातील त्रुटींचा अभ्यास करण्याची गरज ५३ व्या बैठकीत व्यक्त होत दुधाच्या कॅनवर सरसकट १२ टक्के करआकारणी, अग्निशमन यंत्रणांवरील करात सवलत इत्यादी फुटकळ निर्णय या ५३ व्या बैठकीत घेतले गेले. अर्थ मंत्रालयातील कनिष्ठ कारकून जे करू शकले असते ते निर्णय घेण्यासाठी देशातील राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या वस्तू-सेवा कर परिषदेची गरज काय हा प्रश्न या बैठकीचे फलित पाहिल्यावर पडतो.

अचूक शुल्क आकारणी, वीजवापराची माहिती नियमितपणे मिळणे आणि खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे विजेचे स्मार्ट मीटर किंवा प्रीपेड मीटर हे ग्राहकांसाठी वरदानच ठरणार आहेत. प्रीपेड मीटरमुळे वीज बिल वाढेल, हा निव्वळ अपप्रचार आहे...

# स्मार्ट मीटर खर्चीक नव्हे फायद्याचेच!



सध्या विजेचे स्मार्ट मीटर हा विषय चर्चेत आहे. तो खूप तापविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'चे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी त्यात पुढाकार घेतल्याचे दिसते. संघटनेच्या वतीने स्मार्ट मीटरविरोधात निवेदने प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यामध्ये मांडण्यात आलेले मुद्दे घेऊन अनेक संघटना, कार्यकर्ते आणि काही राजकीय पक्षही स्मार्ट मीटरला विरोध करत आहेत. या स्मार्ट वीज मीटरच्या विरोधात सुरू असलेल्या अभियानातील एक प्रमुख मुद्दा असा की, प्रीपेड स्मार्ट मीटरला विरोध करावा. धक्कादायक बाब अशी आहे की, वर्षभरापूर्वी २०२३ मध्ये 'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'च्या वतीने एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याद्वारे वीज ग्राहकांना जाहीर आवाहन करण्यात आले होते की, ज्यांना अतिरिक्त सुरक्षा ठेव द्यायची नसेल त्यांनी प्रीपेड मीटर लावण्यासाठी महावितरणकडे अर्ज करावेत. या प्रसिद्धिपत्रकाबरोबरच ग्राहकांनी प्रीपेड मीटर मिळण्यासाठी अर्ज कसा करावा याचा तयार नमुनादेखील दिला होता. या प्रसिद्धिपत्रकासंदर्भातील बातम्या दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत प्रसिद्धही झाल्या होत्या. संघटनेची सध्याची भूमिका पाहता, असा प्रश्न निर्माण होतो की, स्मार्ट मीटरच्या रूपाने वीज ग्राहकांना प्रीपेड मीटर मोफत मिळण्याची संधी निर्माण झाल्यावर होगाडे यांनी प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात मोहीम का सुरू केली असेल? 'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'ने स्मार्ट मीटरविषयी जो प्रचार सुरू केला आहे, त्यामुळे सामान्य ग्राहकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते. स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंकांचे निरसन झाल्यानंतरच त्यांच्यासाठी ही नवी मीटर्स बसविली जातील, असे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या स्मार्ट मीटर केवळ सरकारी कार्यालये, महावितरणचे ट्रान्सफॉर्मर्स आणि फीडर्सना बसविण्यात येत आहेत आणि ती प्रीपेड नाहीत.अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासूनच उपलब्ध करून देत आहे. घरगुती वीज ग्राहकांसाठी सध्या स्मार्ट मीटर बसविण्यात येत नाहीत. स्मार्ट मीटर हा आता इतका चर्चेचा विषय झाला असल्याने त्याबद्दलच्या शंका दूर करणे गरजेचे आहे. त्यामुळेच या लेखाद्वारे स्मार्ट मीटरबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

या फोनमुळे संभाषणाबरोबरच, मेसेज पाठविणे, सर्च इंजिनचा वापर करून माहिती प्राप्त करणे, छायाचित्रे टिपणे, आवाज रेकॉर्ड करणे, व्हिडीओ चित्रित करणे अशा अनेक बाबी करता येऊ लागल्या. स्मार्ट मीटर हे आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाने युक्त असे विजेचे मीटर आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मला बदामाची गरज नाही!

## मुलींच्या मोफत शिक्षणाच्या अंमलबजावणीला विलंब का?: रोहिणी खडसे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुलींच्या मोफत शिक्षणाच्या घोषणेची आठवण व्हावी म्हणून आम्ही राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना बदाम पाठवणार आहोत, असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरद पवार गट) नेत्या रोहिणी खडसे यांनी केलं होतं, त्यांच्या या विधानावर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, या विधानावर आता चंत्रकांत पाटील यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.**



माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी त्यांनी विविध विषयांवर त्यांनी भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना रोहिणी खडसे यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं, यासंदर्भात बोलताना मी कोल्हापूरचा असून मला बदामाची गरज नाही, असं प्रत्युत्तर त्यांनी रोहिणी खडसे यांना दिलं."रोहिणी खडसे कदाचित मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्याबाबत बोलत असाव्यात. त्यांचं आणि माझं नाव सारखं असल्याने त्यांचा नेहमी गोंधळ होतो. त्यामुळे त्यांना कदाचित त्या चंद्रकांत पाटलांना बदाम पाठवायच्या असतील, मला बदामाची आवश्यकता नाही, कारण मी कोल्हापूरचा आहे", अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील मुलांनी मोफत शिक्षण देणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, त्यांनी अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. यावरून रोहिणी खडसे यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका केली होती. "महायुती सरकारने मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी अद्यापही केलेली नाही. त्यामुळे चंद्रकांत पाटील यांना त्या घोषणेची आठवण व्हावी म्हणून आम्ही त्यांना बदाम पाठवणार आहोत, असं त्या म्हणाल्या होत्या. तसेच राज्यात लवकरच मुलींच्या महाविद्यालयीन प्रवेशाला सुरुवात होणार असून हजारो मुली सरकारच्या या निर्णयाकडे आशेने बघत आहे", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती.दरम्यान, राज्य सरकारने या मुलीच्या मोफत शिक्षणाची घोषणा केली असली तरी या घोषणेच्या अंमलबजावणीला का विलंब का होतो आहे? याबाबत चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी प्रतिक्रिया दिली होती. "लोकसभा आणि आता मुंबईत लागू असलेल्या आचारसंहितेमुळे त्याचा शासन आदेश जाहीर होण्यास विलंब झाला आहे. लवकरच त्याची कार्यवाही पूर्ण होऊन शासन आदेश लागू होईल", असं ते पुण्यातील एका कार्यक्रमात म्हणाले होते.चंद्रकांत पाटील यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी त्यांनी विविध विषयांवर त्यांनी भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना रोहिणी खडसे यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं, यासंदर्भात बोलताना मी कोल्हापूरचा असून मला बदामाची गरज नाही, असं प्रत्युत्तर त्यांनी रोहिणी खडसे यांना दिलं."रोहिणी खडसे कदाचित मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्याबाबत बोलत असाव्यात.

रोहिणी खडसे यांनी केलं होतं, त्यांच्या या विधानावर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, या विधानावर आता चंत्रकांत पाटील यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. माझं नाव सारखं असल्याने त्यांचा नेहमी गोंधळ होतो. कदाचित त्या चंद्रकांत पाटलांना बदाम पाठवायच्या असतील, मला बदामाची आवश्यकता नाही, कारण मी कोल्हापूरचा आहे", अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील मुलांनी मोफत शिक्षण देणार असल्याची घोषणा केली होती.

### काय म्हणाले चंद्रकात पाटील?

मुलींच्या मोफत शिक्षणाच्या घोषणेची आठवण व्हावी म्हणून आम्ही राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना बदाम पाठवणार आहोत, असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरद पवार गट) नेत्या रोहिणी खडसे यांनी केलं होतं, मात्र, त्यांनी अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. यावरून रोहिणी खडसे यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका केली होती. "महायुती सरकारने मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी अद्यापही केलेली नाही. त्यामुळे चंद्रकांत पाटील यांना त्या घोषणेची आठवण व्हावी म्हणून आम्ही त्यांना बदाम पाठवणार आहोत, असं त्या म्हणाल्या होत्या. तसेच राज्यात लवकरच मुलींच्या महाविद्यालयीन प्रवेशाला सुरुवात होणार असून हजारो मुली सरकारच्या या निर्णयाकडे आशेने बघत आहे", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती.दरम्यान, राज्य सरकारने या मुलीच्या मोफत शिक्षणाची घोषणा केली असली तरी या घोषणेच्या अंमलबजावणीला का विलंब का होतो आहे? याबाबत चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी प्रतिक्रिया दिली होती. "लोकसभा आणि आता मुंबईत लागू असलेल्या आचारसंहितेमुळे त्याचा शासन आदेश जाहीर होण्यास विलंब झाला आहे. लवकरच त्याची कार्यवाही पूर्ण होऊन शासन आदेश लागू होईल.

# निरोप द्यायला सभागृहात तर यायला पाहिजे ना?

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना खोचक टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवारपासून (२७ जून) सुरु होणार आहे. त्याआधी आज राज्य सरकारकडून चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला.**

तसेच उद्धव ठाकरे यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना या महायुती सरकारच्या निरोपाचं अधिवेशन असल्याचा टोला लगावला होता. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं आहे. "निरोप द्यायला सभागृहात तर यायला पाहिजे ना? की फेसबुक लाईव्ह वरूनच निरोप देणार?", असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.या पंचवार्षिकमधील हे शेवटचं अधिवेशन आहे. त्यामुळे आम्हाला वाटलं होतं की विरोधक



चर्चा करतील. चहापानाला येतील. मात्र, त्यांनी एक पत्र दिलं. त्यामध्येही तेच तेच म्हटलं आहे. त्यामुळे आमची सभागृहात बोलण्याची आणि उत्तरं देण्याची तयारी आहे. पण विरोधकांची नाही. ते फक्त येतात आणि खोटं बोल पण रेटून बोल असं बोलतात. विरोधी पक्ष गोंधळलेला आहे. ते तुमच्यासमोर छाती फुगून आले असतील आणि म्हणाले असतील की महायुतीला लोकसभेत यश मिळालं नाही, त्यामुळे सत्ताधारी पोकळ आश्वासनाची घोषणा करतील. शिंदे पुढे म्हणाले की, "विरोधकांनी एवढं करूनही काँग्रेसला फक्त ९९ जागा मिळाल्या. म्हणजे तीन टर्ममध्ये ४०, ५० आता ९९. मग आता तुम्हाला २४० पर्यंत पोहण्यासाठी २५ वर्ष लागतील. एवढं सर्व करून काय झालं? शेवटी नरेंद्र मोदीच पंतप्रधान झाले. त्यामुळे मोदी जिंकले आणि इंडिया आघाडीचा पराभव झाला. तरी सुद्धा आमचे काही लोक दुसऱ्यांच्या वरातीत घोड नाचवणारे आहेत.

### फेसबुक लाईव्हवरून निरोप देणार का?

मी छातीठोकपणे सांगतो. घरी बसलेल्यांना लोक मतदान करत नाहीत. जे मैदानात उतरून काम करतात त्यांना लोक मतदान करतात. काही लोक म्हणाले की, हे निरोपाचं अधिवेशन आहे. आता निरोप देण्यासाठी सभागृहात तर यायला पाहिजे ना? की फेसबुक लाईव्हवरूनच निरोप देणार? निरोप द्यायचा की घ्यायचा हे जनता ठरवत असते", असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

# विरोधी पक्षनेता हे फक्त पद नाही!

## राहुल गांधी यांनी व्हिडीओ पोस्ट करत जनतेचे मानले आभार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली आहे. त्यामुळे आता नरेंद्र मोदी यांच्या विरोधात राहुल गांधी बोलणार आहेत. आज ओम बिर्ला यांचं अभिनंदन करताना राहुल गांधी यांनी पुढे होणाऱ्या संघर्षाची चुणूकही दाखवून दिली. विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर राहुल गांधी यांनी व्हिडीओ पोस्ट करत जनतेचे आभार मानले आहेत.**



लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला चांगलं यश मिळालं आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाने आम्ही एनडीएसह ४०० पार जाणार असा नारा दिला होता. मात्र भाजपाला २४० जागा मिळवता आल्या. तर इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या. काँग्रेसला देशभरात ९९ जागांवर यश मिळालं. महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये भाजपाला फटका बसला आहे. त्याचा परिणाम निश्चितच लोकसभा निवडणुकीवर झाला. लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे आलं आहे. दोन दिवसांपासून लोकसभेत खासदारांचा शपथविधी पार पडला. त्यानंतर राहुल गांधी यांनी व्हिडीओ पोस्ट केला आहे. देशातील जनतेला, काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना, इंडिया आघाडीच्या नेत्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. मला कुणीतरी विचारलं की माझ्यासाठी विरोधी पक्षनेतेपदाचा अर्थ काय? त्यावर मी म्हणालो की लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणजे लोकसभेतला तुमचा आवाज आहे. तुमच्या मनातल्या भावना, तुमचे प्रश्न, समस्या आहेत त्या विरोधी पक्षनेतेपदाच्या माध्यमातून मी मांडेन. देशातले गरीब लोक, दलित, आदिवासी, मागासवर्गीय, शेतकरी, कामगार असो समाजातला कुठलाही घटक असो मी तुमचाच आहे. या आशयाचं वक्तव्य राहुल गांधींनी केलं आहे. राहुल गांधी म्हणाले, संविधानामुळे तुमचं संरक्षण होतं आहे. जर सरकारने संविधानावर आक्रमण केलं, संविधान वाकवण्याचा प्रयत्न केला तर तिथे पूर्ण ताकदीने आम्ही संविधानाचं रक्षण करणार. मी तुमचा आवाज संसदेत बनून संसदेत काम करणार अशी गॅरंटीही राहुल गांधीनी दिली.राहुल गांधी यांनी लोकसभा अध्यक्षपदी निवड झाल्यावर ओम बिर्ला यांचं अभिनंदन केले. त्यांना त्यांच्या आसन व्यवस्थेपर्यंत नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी आणि संसदीय कार्यमंत्री रिजिजू गेले होते. यावेळी राहुल गांधी यांनी ओम बिर्ला यांचे अभिनंदन केले. त्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी हस्तांदोलन केले. दोन्ही नेत्यांनी लोकसभा निवडणूक काळात एकमेकांवर तुफान हल्लाबोल केला होता. राहुल गांधींचा उल्लेख मोदींना 'शहजादा' असा केला होता. तर पंतप्रधान मोदी हे तिरस्कार पसरवत आहेत, आमची लढाई विचारधारांची आहे असं राहुल गांधी म्हणाले होते. याशिवाय इतर आरोप-प्रत्यारोपांचं राजकारणही रंगलं होतं.लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला चांगलं यश मिळालं आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाने आम्ही एनडीएसह ४०० पार जाणार असा नारा दिला होता. मात्र भाजपाला २४० जागा मिळवता आल्या. तर इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या. काँग्रेसला देशभरात ९९ जागांवर यश मिळालं. महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये भाजपाला फटका बसला आहे. त्याचा परिणाम निश्चितच लोकसभा निवडणुकीवर झाला. लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे आलं आहे. दोन दिवसांपासून लोकसभेत खासदारांचा शपथविधी पार पडला. त्यानंतर राहुल गांधी यांनी व्हिडीओ पोस्ट केला आहे.

### काय म्हणाले राहुल गांधी?

मला कुणीतरी विचारलं की माझ्यासाठी विरोधी पक्षनेतेपदाचा अर्थ काय? त्यावर मी म्हणालो की लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणजे लोकसभेतला तुमचा आवाज आहे. तुमच्या मनातल्या भावना, तुमचे प्रश्न, समस्या आहेत त्या विरोधी पक्षनेतेपदाच्या माध्यमातून मी मांडेन. देशातले गरीब लोक, दलित, आदिवासी, मागासवर्गीय, शेतकरी, कामगार असो समाजातला कुठलाही घटक असो मी तुमचाच आहे. या आशयाचं वक्तव्य राहुल गांधींनी केलं आहे.राहुल गांधी म्हणाले, संविधानामुळे तुमचं संरक्षण होतं आहे. जर सरकारने संविधानावर आक्रमण केलं, संविधान वाकवण्याचा प्रयत्न केला तर तिथे पूर्ण ताकदीने आम्ही संविधानाचं रक्षण करणार. मी तुमचा आवाज संसदेत बनून संसदेत काम करणार अशी गॅरंटीही राहुल गांधीनी दिली. राहुल गांधी यांनी लोकसभा अध्यक्षपदी निवड झाल्यावर ओम बिर्ला यांचं अभिनंदन केले. त्यांना त्यांच्या आसन व्यवस्थेपर्यंत नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी आणि संसदीय कार्यमंत्री रिजिजू गेले होते. यावेळी राहुल गांधी यांनी ओम बिर्ला यांचे अभिनंदन केले. त्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी हस्तांदोलन केले. दोन्ही नेत्यांनी लोकसभा निवडणूक काळात एकमेकांवर तुफान हल्लाबोल केला होता. राहुल गांधींचा उल्लेख मोदींना 'शहजादा' असा केला होता. तर पंतप्रधान मोदी हे तिरस्कार पसरवत आहेत.

# लोकसभा अध्यक्षांच्या निवडीवर काँग्रेसचा आक्षेप

## नरेंद्र मोदी यांनी मांडलेला प्रस्ताव आवाजी मतदानाद्वारे मंजूर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा अध्यक्ष म्हणून ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली आहे. काँग्रेसचे के. सुरेश हेसुद्धा या पदाच्या शर्यतीत होते. परंतु, आवाजी मतदानात ओम बिर्ला यांची निवड झाली. दरम्यान, या निवडणुकीवर तृणमूल काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. सभागृहाबाहेर येऊन तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी माध्यमांशी संवाद साधून भाजपावर टीका केली आहे.**

, "नियमानुसार सभागृहाच्या कोणत्याही सदस्याने मत विभाजनाची मागणी केल्यास, हंगामी अध्यक्षांनी परवानगी दिली पाहिजे. संसदेतील लाईव्ह टीव्ही फुटेजमध्ये तुम्ही पाहू शकता की विरोधी पक्षातील सदस्यांनी मतविभाजनाची मागणी केली होती. मतदानासाठी प्रस्ताव ठेवण्याची मागणी केली होती. परंतु, मतदानासाठी प्रस्ताव न ठेवता आवाजी मतदान घेण्यात आले. सत्ताधारी पक्षाकडे, भाजपाकडे संख्याबळ नाही याचा हा स्पष्ट पुरावा आहे. हे सरकार आकड्यांशिवाय चालत आहे. हे बेकायदा, अनैतिक आणि असंवैधानिक सरकार आहे."राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे



(NDA) उमेदवार ओम बिर्ला यांची लोकसभेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेला प्रस्ताव आवाजी मतदानाद्वारे मंजूर करण्यात आला. काँग्रेसनेही के. सुरेश यांना या शर्यतीत ठेवलं होतं. परंतु, मतविभाजन झाले नसल्याने विरोधकांनी यावर प्रचंड टीका केली आहे. परंतु, मत विभाजनासाठी विरोधकांनी दबाव आणला नाही, असा आरोप सत्ताधाऱ्यांकडून केला जातोय. त्यावर अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, ५०० पैकी एकाने जरी मतविभाजनाची मागणी केली तरी मतविभाजन करावं लागतं. हाच नियम आहे. त्यामुळे मतविभाजनास का नकार देण्यात आला.

### दुर्दैवाने हा एकतर्फी निर्णय

याचा खुलास हंगामी अध्यक्षांनी केलाच पाहिजे.लोकसभा अध्यक्षपदाच्या उमेदवारी संदर्भात बोलताना तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी म्हणाले, "लोकसभा अध्यक्षपदासाठी विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणून के सुरेश यांना नामनिर्देशित करण्यात आले. मात्र, के सुरेश यांना नामनिर्देशित करण्यापूर्वी काँग्रेसने तृणमूल काँग्रेस पक्षाची सल्लामसलत करायला हवी होती. मात्र, कोणतीही चर्चा केली नाही. याबाबत आमच्याशी संपर्क साधला गेला नाही. कोणतीही चर्चा झाली नाही. त्यामुळे दुर्दैवाने हा एकतर्फी निर्णय आहे", असं अभिषेक बॅनर्जी यांनी म्हटलं होतं.

# "सहा कोटींची कार घेतली अन् आता सायकल का चालवतोस?

बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याचा आगामी चित्रपट 'भूल भूलैया ३' च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. आता अलीकडेच अभिनेत्याने त्याच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. कार्तिकने एक नवीन आलिशान अशी रेंज रोव्हर एसयुव्ही खरेदी केली आहे, ज्याची किंमत ६ कोटी रुपये आहे. परंतु कार खरेदी केल्यानंतर, अभिनेता आता सायकल चालवताना दिसला आहे, यावर चाहत्यांनी अभिनेत्याला काही धमाल प्रश्नदेखील विचारले आहेत. कार्तिकने नुकतंच एक रील शेअर केलं आहे, ज्यामध्ये तो सायकल चालवताना दिसत आहे. त्यानंतर त्याने या रीलवर आलेल्या चाहत्यांच्या काही कमेंट्सना उत्तरही दिले. जेव्हा चाहत्यांनी अभिनेत्याला ६ कोटी रुपयांची नवीन कार खरेदी केल्यानंतरही सायकल का चालवत आहे असे विचारले. तेव्हा कार्तिकने त्याला भन्नाट उत्तर





दिले आहे.कार्तिकने हे रील त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिले की, "आता मी सायकलवरून सेटवर जाण्याचा विचार करत आहे." अभिनेत्याच्या या रीलवर टिप्पणी करताना एका यूजरने म्हटले की, "मला तुझी ६ कोटी रुपयांची कार दे." या कमेंटवर कार्तिकने मजेशीर उत्तर दिले आणि म्हणाला, "मी दुसऱ्या एका मित्राला वापरायला दिली आहे... ती परत आल्यावर सांगेन.

## ते मला हातोड्याने मारायचे

रवी किशन किरण रावच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लापता लेडीज' या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वडिलांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं. रामलीलामध्ये अभिनय करण्यास सुरुवात केल्यावर वडील खूप रागावले होते. पण नंतर मात्र आपण सिनेसृष्टीत करिअर केल्यावर त्यांना माझा खूप अभिमान वाटत होता, असं रवी किशन यांनी सांगितलं. 'ब्रुट'ला दिलेल्या एका मुलाखतीत रवी किशन यांनी खुलासा केला की वडिलांच्या रागामुळे त्यांना १७ व्या वर्षी घरातून पळून जावं लागलं होतं. "माझे वडील मला खूप मारत होते, ते मला हातोड्याने मारायचे. त्यांना माझा खून करायचा होता आणि माझ्या आईला माहित होतं की बाबा मला मारू शकतात. ते माझा जीव घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे आई मला म्हणाली की 'पळून जा'. खिशात ५०० रुपये घेऊन मी घर सोडलं आणि मुंबईला जाणारी ट्रेन पकडली होती," असं रवी किशन म्हणाले.रवी किशन यांनी वडिलांच्या अशा वागणुकीचं समर्थनही केलं. "ते पुजारी होते आणि ब्राह्मण असल्याने मी शेती करावी किंवा पुजारी व्हावं किंवा सरकारी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या कुटुंबात एखादा कलाकार जन्माला येऊ शकतो,.

## सारा खानने केला रॅम्प वॉक



'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला ओटीटीवर तिचा 'ऐ वतन मेरे वतन' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे. धर्मा प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या या चित्रपटात सारासह अभिनेता इमरान हाश्मी पाहायला मिळणार आहे.'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे.

## देवाशिष माखिजा यांनी व्यक्त केली खंत

मनोज बाजपेयींच्या 'जोरम' या चित्रपटाचे दिग्दर्शक देवाशिष माखिजा यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी चित्रपट, राजकारण, कला, त्यांचा प्रवास आणि संघर्ष याविषयी सांगितले. एक चांगला चित्रपट बनवण्यासाठी किती मोठा संघर्ष करावा लागतो हे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले. 'आज्जी' आणि 'जोरम'सारखे अप्रतिम चित्रपट बनवल्यानंतरही पुढचा चित्रपट बनवणे कठीण असल्याचं त्याने स्पष्ट केलं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जोरम'ला अप्रतिम रेटिंग मिळाले तसेच समीक्षकांनीही चित्रपटाला उचलून धरले पण त्यानंतरही देवाशिष यांचा संघर्ष सुरूच आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये देवाशिष म्हणाले, "२० वर्षे या इंडस्ट्रीमध्ये काम करूनसुद्धा माझ्या एकाही चित्रपटातून आर्थिक फायदा मला झालेला नाही. माझी चाळीशी उलटून चालली आहे अन् म्हणालेकमावले नाहीत. मला माझ्या घराचे भाडे भरणेदेखील जमत नाहीये. गेले पाच महीने मी भाडे दिलेले नाही. सध्या मी माझ्या घरमालकाकडे विनंती करतो आहे की त्याने मला घराबाहेर काढू नये. जेव्हा तुम्ही तुमच्या कलागुणांना अधिक प्राधान्य देता तेव्हा त्याची एक मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागते." हा एक संघर्ष आणि यासाठी ते तयार आहेत असंही देवाशिष या मुलाखतीदरम्यान म्हणाले. देवाशिष यांनी याआधीही या विषयावर भाष्य केलं आहे. त्याने २०१७ मध्ये रिलीज त्यांचा पहिला चित्रपट आला.




## क्रिती आणि पुलकित यांनी बांधली लग्नगाठ

अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राटयांनी लग्नगाठ बांधली आहे. दोघांचा लग्नसोहळा धुमधडाक्यात पार पडला आहे. क्रिती आणि पुलकित या नवविवाहित जोडप्याने नुकतेच त्यांच्या लग्नसोहळ्याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या या फोटोंवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.क्रिती आणि पुलकित यांनी शेअर केलेल्या लग्नसोहळ्याच्या फोटोमध्ये दोघेही खास लूकमध्ये दिसत आहेत. लग्नसोहळ्यासाठी क्रितीनं पिंक कलरचा लेहंगा आणि स्टोनची ज्वेलरी असा लूक केला होता. तर पुलकितनं लग्नसोहळ्यात सी ग्रीन कलरची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीच्या डिझाईननं अनेकांचे लक्ष वेधले होते.2014 मध्ये पुलकितनं श्वेता रोहिरासोबत लग्न केले होते. श्वेता ही सलमान खानची 'राखी सिस्टर' आहे. पण पुलकित आणि श्वेता यांचा संसार फार काळ टिकला नाही. पुलकित आणि श्वेता यांनी 2015 मध्ये घटस्फोट घेतला.वीरें की वेडिंग आणि तैश या चित्रपटांमध्ये क्रिती आणि पुलकित यांनी काम केलं आहे. पण पागलपंती या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान क्रिती आणि पुलकित हे एकमेकांच्या प्रेमात पडले. फुकरे, फुकरे रिटर्न्स, जय हो या चित्रपटात पुलकितनं काम केलं.

# अफगाणिस्तान इतिहास घडवणार?

## रशीदच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करणं आफ्रिकेसमोर आव्हान

नवी दिल्ली | | वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषक २०२४ आता उपांत्य फेरीतील सामन्यांपर्यंत येऊन पोहोचला आहे. २० संघांच्या या स्पर्धेत आतापर्यंत १६ संघ विजेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडले असून ४ संघ बाद फेरीत पोहोचले असून आता ते विजेतेपदासाठी लढणार आहेत. येथे स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा सामना अफगाणिस्तानशी होणार आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेसमोर चोकर्सचा टॅग हटवण्याचे आव्हान असेल. तर प्रथमच आयसीसी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचलेल्या अफगाणिस्तानलाही आश्चर्यकारक कामगिरी करायची आहे. त्यामुळे हा सामना मोठा रोमांचक होणार आहे.**




अफगाणिस्तानची फिरकी गोलंदाजी जबरदस्त आहे. रशीद खान, मोहम्मद नबी, नूर अहमद हे उत्कृष्ट फिरकीपटू अफगाणिस्तानच्या ताफ्यात आहेत. रशीदच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करणं आफ्रिकेसमोर मोठं आव्हान असणार आहे. तर वेगवान गोलंदाजांमध्ये फजलक फारूकी आणि नवीन उल हकची जोडी आहे. नवीन हाणामारीच्या षटकांमध्येही भेदक गोलंदाजी करतो तर त्याचे स्लोअर बॉल फलंदाजांना चकवतात. फजलक फारूकी पॉवरप्लेमध्ये विकेट्स घेण्यासाठी ओळखला जातो. याचसोबत तो यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमधील सर्वाधिक विकेट्स घेणार खेळाडू आहे. गुलबदीन नईबने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकटाकी विजय मिळवून दिला होता.हेनरिच क्लासेन विरुद्ध अफगाणिस्तानचा संघ यांच्यातील लढत या सामन्याची दिशा ठरवेल. क्लासेनचा बॅकफूट पुल आणि स्लॉग स्वीप कोणत्याही फिरकीपटूची लय खराब करू शकतात. २०२३ च्या सुरुवातीपासून, त्याने टी-२० क्रिकेटमध्ये स्पिनर्सविरुद्ध १८२.१२ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत. यादरम्यान, टी-२० क्रिकेटमध्ये फिरकीपटूंविरुद्ध किमान ४० डाव खेळलेल्या ४१ फलंदाजांपैकी क्लासेनचा स्ट्राइक रेट सर्वोत्तम आहे.दक्षिण आफ्रिका एक उत्कृष्ट संघ आहे. या संघाने जागतिक क्रिकेटमधील अनेक मोठमोठे दिग्गज घडवले होते. पण महत्त्वाच्या करो या मरो सामन्यांमध्ये हा संघ नेहमी कमी पडतो. मोक्याच्या दडपणाच्या क्षणी कच खाणारा संघ असं दक्षिण आफ्रिकेला म्हटलं जातं, यावरूनच त्यांना चोकर्स हे नाव पडलं. आयसीसी ट्रॉफीचे जेतेपद पटकावून तब्बल २६ वर्षे झालेला दक्षिण आफ्रिकेचा संघ यंदा तरी जेतेपद पटकावणार का यावर सर्वांच्या नजरा आहेत. यंदाच्या विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेचा संघ आतापर्यंत अजिंक्य राहिला आहे, पण अफगाणिस्ताननेही न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारख्या संघांना पराभूत करून स्पर्धेत मोठे अपसेट केले आहेत. अफगाणिस्तानने गट सामन्यात मध्ये दक्षिण आफ्रिकेला आपल्या जाळ्यात अडकवले होते पण त्यांनी विजय मिळवला. आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अफगाणिस्तानचा संघ काय रणनीती आखतो यावर सर्वांच्या नजरा असतील.विश्वचषक २०२४ मधील पहिला उपांत्य सामना दक्षिण आफ्रिका वि अफगाणिस्तान यांच्यात खेळवला जात आहे. अफगाणिस्तानने सर्वांनाच चकित करत सेमीफायनलमध्ये धडक मारली तर दक्षिण आफ्रिकेचा संघाने यंदाही एकही सामना न गमवता सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे.अफगाणिस्तानची फिरकी गोलंदाजी जबरदस्त आहे. रशीद खान, मोहम्मद नबी, नूर अहमद हे उत्कृष्ट फिरकीपटू अफगाणिस्तानच्या ताफ्यात आहेत. रशीदच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करणं आफ्रिकेसमोर मोठं आव्हान असणार आहे.

### कोण मारणार बाजी?

तर वेगवान गोलंदाजांमध्ये फजलक फारूकी आणि नवीन उल हकची जोडी आहे. नवीन हाणामारीच्या षटकांमध्येही भेदक गोलंदाजी करतो तर त्याचे स्लोअर बॉल फलंदाजांना चकवतात. फजलक फारूकी पॉवरप्लेमध्ये विकेट्स घेण्यासाठी ओळखला जातो. याचसोबत तो यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमधील सर्वाधिक विकेट्स घेणार खेळाडू आहे. गुलबदीन नईबने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकटाकी विजय मिळवून दिला होता.हेनरिच क्लासेन विरुद्ध अफगाणिस्तानचा संघ यांच्यातील लढत या सामन्याची दिशा ठरवेल. क्लासेनचा बॅकफूट पुल आणि स्लॉग स्वीप कोणत्याही फिरकीपटूची लय खराब करू शकतात. २०२३ च्या सुरुवातीपासून, त्याने टी-२० क्रिकेटमध्ये स्पिनर्सविरुद्ध १८२.१२ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत.

# सूर्यने गमावलं टी-२० क्रमवारीतलं अव्वल स्थान

## ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड पहिल्या क्रमांकाचा फलंदाज ठरला

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ दरम्यान आयसीसीने नवीन टी-२० रँकिंग जाहीर केली आहे. यावेळी रँकिंगमध्ये मोठे बदल झाले आहेत. विशेष म्हणजे भारताचा सूर्यकुमार यादव जो बराच काळ पहिल्या क्रमांकावर होता. या पहिल्या स्थानावरून आता सूर्यकुमार घसरून दुसऱ्या स्थानी गेला आहे. भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करत सेमीफायनलमध्ये आपले स्थान पक्के केले पण या विजयानंतर ऑस्ट्रेलियाच्या ट्रेव्हिस हेडने सूर्यकुमार यदवला धक्का दिला.**




आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड पहिल्या क्रमांकाचा फलंदाज ठरला आहे. सूर्यकुमार यादवला मागे सारत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड टी-२० मध्ये नंबर वन बॅट्समन बनण्यात यशस्वी ठरला आहे. यावेळी त्याने एकाच वेळी 4४ स्थानांनी झेप घेतली आहे. आता ट्रॅव्हिस हेडचे रेटिंग ८४४ गुण झाले आहे. ट्रॅव्हिस हेड गेल्या काही काळात पहिल्या दहामध्येही नव्हता, पण आता तो अव्वल स्थानावर पोहोचला आहे. भारताचा सूर्यकुमार यादव दुसऱ्या क्रमांकावर गेला आहे. सूर्याचे रेटिंग सध्या ८४२ग गुण आहे. म्हणजे पहिला आणि दुसरा फलंदाज यांच्यात फक्त दोन रेटिंग गुणांचा फरक आहे. हा फरक सूर्या सहज भरून काढू शकतो पण यासाठी त्याला मोठी खेळी खेळावी लागणार आहे.इंग्लंडचा फिल सॉल्ट, पाकिस्तानचा बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान हे खेळाडूही एक-एक घर खाली घसरले आहेत. इंग्लंडच्या फिल सॉल्टला एका स्थानाचा फटका बसला आहे. त्याचे रेटिंग आता ८१६ गुण आहे. पाकिस्तानच्या बाबर आझमचीही एका स्थानाने घसरण झाली आहे. तो ७५५ च्या रेटिंगसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान ७४६ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### ट्रॅव्हिस हेड – ऑस्ट्रेलिया -844 गुण

आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड पहिल्या क्रमांकाचा फलंदाज ठरला आहे. सूर्यकुमार यादवला मागे सारत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड टी-२० मध्ये नंबर वन बॅट्समन बनण्यात यशस्वी ठरला आहे. यावेळी त्याने एकाच वेळी 4४ स्थानांनी झेप घेतली आहे. आता ट्रॅव्हिस हेडचे रेटिंग ८४४ गुण झाले आहे. ट्रॅव्हिस हेड गेल्या काही काळात पहिल्या दहामध्येही नव्हता, पण आता तो अव्वल स्थानावर पोहोचला आहे. भारताचा सूर्यकुमार यादव दुसऱ्या क्रमांकावर गेला आहे. सूर्याचे रेटिंग सध्या ८४२ग गुण आहे. म्हणजे पहिला आणि दुसरा फलंदाज यांच्यात फक्त दोन रेटिंग गुणांचा फरक आहे. हा फरक सूर्या सहज भरून काढू शकतो पण यासाठी त्याला मोठी खेळी खेळावी लागणार आहे.